# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुमुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन.गे.बा.
सेनापती बापट मार्ग४०००१३मुंबई ,एलफिन्स्टन ,
दुरध्वनी क्रं.४३२२६८०७ / ४३२२६८११ / ४३२२६८१८
E-mail – mlwbconteeg@gmail.com, conteeg.mlwb-mh@gov.in


जा.क्र.निधीवसूली/२०१९-२०/४१३ दिनांक १०.१२.२०१९

प्रति,
मा. व्यवस्थापक आस्थापना

विषय :- **महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ कलम ६ बब अन्वये कामगार कल्याण निधीचा ऑनलाइनद्वारे भरणा करणेबाबत.**

महोदय,

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून आपणास नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा

आपणास कळविण्यास आनंद होतो की, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने EASE OF DOING BUSINESS अंतर्गत कामगार कल्याण निधि भरणा करण्यासाठी ऑनलाइन पेमेंट गेटवेद्वारे कामगार/ मालक वर्गणीचा भरणा करणे सोपे व सोईचे होण्याच्या दृष्टीकोनातून मंडळाचे संकेतस्थळ/ वेबपोर्टल ( https://public.mlwb.in ) तयार केले आहे. त्यामुळे सदर संकेतस्थळाद्वारे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अधिनियम १९५३ च्या तरतूदीच्या कलम ६ बब अन्वये राज्यातील सर्व आस्थापनांना डिसेंबर २०१९ च्या कालावधीपासूनचा कामगार - मालक वर्गणी भरणा ऑनलाइन पेमेंट गेटवेद्वारे १ जानेवारी २०२० पासून करू शकणार आहेत. सर्व आस्थापनांना याकरिता सदर संकेतस्थळावर प्रथम ( एकदाच ) नोंदणी करून कामगार - मालक वर्गणीचे तपशिल देऊन भरणा करणे आवश्यक आहे. सुरक्षित पेमेंट गेटवेच्या सुविधेचा वापर करून डेबिट कार्ड/ क्रेडिट कार्ड/ नेट बँकिंग/ पेमेंट ॲप्स/ एन.ई.एफ.टी./ आर.टी.जी.एस. वैगेरेच्या माध्यमातून भरणा करता येणे शक्य होणार आहे.

संकेतस्थळाबाबत संक्षिप्त मार्गदर्शक माहिती :-

१. सर्व आस्थापनांना सदर संकेतस्थळावर प्रथम ( एकदाच ) नोंदणीकरिता माहिती सादर करावी लागेल, त्यानंतर त्यांना तपशीलात नमूद केलेल्या भ्रमणध्वनीवर ओ.टी.पी. येईल तो ओ.टी.पी. संकेत स्थळावरील तपशीलात घेऊन संकेतस्थळाचा संकेतशब्द (पासवर्ड) वापरुन अधिकृतपणे उपयोग करता येईल. सदर आस्थापनेस देण्यात आलेला संकेतशब्द (पासवर्ड) वेळोवेळी बदलण्याची सुविधा देण्यात आलेली आहे.

२. आस्थापनांना संकेतस्थळावर आस्थापनेची नोंदणी करताना पॅन क्रमांक प्रथम ( एकदाच ) सादर करणे आवश्यक आहे.

३. प्रत्येक कर्मचा-याचे तपशील (उदा. नाव, भ्रमणध्वनी क्र, कर्मचा-याची श्रेणी वैगेरे) संकेत स्थळावरील आस्थापनाच्या तपशील सादर करतेवेळी द्यावी लागेल त्यामुळे मंडळामार्फत राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांचा कर्मचा-यांना लाभ घेणे सुलभ होईल.

४. वरील प्रमाणे आस्थापनेने माहिती सादर केल्यानंतर आस्थापनेच्या प्रत्येक कर्मचा-यास कायमस्वरूपी सांकेतीक क्रमांक (एल.आय.एन.) (कर्मचारी ओळख क्रमांक) स्वरुपात त्यांनी सादर केलेल्या भ्रमणध्वनीवर मेसेजद्वारे कळविण्यात येईल.

५. सदर पुरविण्यात आलेल्या (एल.आय.एन.) द्वारे आस्थापनेच्या कर्मचारी वर्ग मंडळाच्या कल्याणकारी विविध योजना, कार्यक्रम व उपक्रम बाबतचे लाभ घेणेकरीता (जसे शिष्यवृत्ती, क्रीडा शिष्यवृत्ती, बुकबँक, असाध्यरोग, एम.एस.सी.आय.टी. वैगेरे ) मंडळाच्या संकेतस्थळ/ मोबाईल अ‍ॅप्सच्या माध्यमातून ऑनलाइन अर्ज तात्काळ करू शकतील.

६. कर्मचारी त्यांच्या कुटुंबियांनाही मंडळाच्या सोई सुविधेचा लाभ मंडळाच्या संकेतस्थळ/ मोबाईल अ‍ॅप्सच्या माध्यमातून घेऊ शकतात.

७. कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय मंडळाच्या सोई सुविधेचा लाभ घेणेकरीता वेळोवेळी आकरण्यात येणारी सभासद फी तसेच विविध सोई सुविधांच्याकरिता आकरण्यात फी ऑनलाइन पमेंट गेटवेच्या माध्यमातून संकेतस्थळ/ मोबाईल अ‍ॅप्सद्वारे भरणा करता येऊ शकेल.

८. आस्थापने मार्फत भरणा करण्यात येणा-या कामगार/ मालक वर्गणीच्या पावत्या आस्थापनेस तात्काळ पी.डी.एफ. स्वरुपात डाऊनलोड करून घेता येईल.

९. कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांनी मंडळाच्या सोई सुविधेचा लाभ घेणेकरीता वेळोवेळो भरणा करण्यात आलेल्या फीची पावती तात्काळ पी.डी.एफ. स्वरुपात डाऊनलोड करून घेता येईल.

कोणत्याही आस्थापनेवर अतिरिक्त बोजा न लादता, आम्ही कामगार व कामगार कुटुंबिय यांना त्यांच्या कल्याणार्थ चांगल्या दर्जेदार सोई सुविधा जलद गतीने व प्रभावीपणे देण्याकरीता आपल्या सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

Mayade

(महेंद्र र. तायडे )
प्र. कल्याण आयुक्त